# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यात रिक्षासाठी परमिट देणे बंद असल्यामुळे परमिटचा अवैध व्यवसाय होत असल्याबाबत

**(१) ११९ (२३-१२-२०१४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १९९७ पासून रिक्षासाठी परमिट देणे बंद असल्यामुळे परमिटचा अवैध व्यवसाय जोरात चालू असून रिक्षा नसतांनाही केवळ परमिट नावावर असल्याने अनेक जण पैसे कमावत असून या व्यवसायात कोट्यवधी रुपयाची उलाढाल होत असल्याचे माहे जुलै, २०१४ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परमिटधारकांच्या दादागिरीमुळे रिक्षाचालक आर्थिक संकटात सापडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आरटीओकडे तक्रारी करुनही त्याकडे संबंधित यंत्रणा दुर्लक्ष करीत असल्याने सामान्य रिक्षाचालकांची पिळवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०२-०८-२०१७)** :(१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

तसेच दि.१७.०६.२०१७ च्या शासन अधिसूचनेद्वारे रिक्षा परवान्यावरील निर्बंध उठविण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माथेरान (जि.रायगड) येथील शाळा दूरवर असल्याने तसेच वाहनांअभावी विद्यार्थ्यांना विशेषत: अपंग विद्यार्थ्यांना पायपीट करावी लागत असल्याबाबत**

**(२) ८०२९ (०४-०४-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (जि.रायगड) येथील शाळा दूरवर असल्याने तसेच वाहनां अभावी विद्यार्थ्यांना विशेषतः अपंग विद्यार्थ्यांना पायपीट करावी लागते त्यात त्यांची दमछाक होत असल्याने त्याचा अभ्यासावर परिणाम होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने बॅटरीवर चालणा-या वाहनांना परवानगी देऊन त्याची अद्याप अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०२-०८-२०१७) :**(१), (२) व (३) माथेरान नियमावली, १९५९ व केंद्रीय पर्यावरण संरक्षण कायदा-१९८६ च्या केंद्रिय पर्यावरण व वन विभागाच्या दि.०४/०२/२००३ च्या अधिसूचनेप्रमाणे माथेरान म्युनिसिपल परिषदेच्या हद्दीत सर्व प्रकारच्या वाहनांना (ॲम्ब्युलन्स व फायर फायटर वगळून) वाहतूक बंदी करण्यात आली आहे.

(४) व (५) सदर बाब शासनाच्या कार्यवाहीखाली आहे.

---

**राज्यात रिक्षा परवान्यासाठी शैक्षणिक पात्रतेची अट शिथिल करण्याबाबत**

**(३) २५४५९ (१२-०८-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रिक्षा परवान्यासाठी शैक्षणिक पात्रतेची अट शिथिल करण्याबाबत सहाय्यक परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनाकडे माहे एप्रिल, २०१५ रोजी वा त्या दरम्यान अहवाल पाठवला आहे, ही खो आहे काय,

(२) असल्यास, रिक्षा चालकाना परवाना मिळण्यासाठी शैक्षणिक पात्रतेची अट शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०२-८-२०१७) :** (१) व (२) राज्यात ऑटोरिक्षा परवान्याचे फेरवाटप करण्यासाठी शैक्षणिक अर्हतेची कोणतीही अट लागू असणार नाही असे दिनांक २३.१०.२०१५ च्या पत्रान्वये परिवहन आयुक्त कार्यालयात कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठी बोलता येणाऱ्यानाच रिक्षा परवाने देणेबाबत**

**(४) २८५६७ (१३-०१-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परिवहन विभागाने मुंबई व उपनगरात नोव्हेंबर, २०१५ मध्ये एक लक्ष नवीन रिक्षा परवाने देण्याचा निर्णय सप्टेंबर, २०१५ वा त्या दरम्यान घेतला आहे हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परवाने देताना परवाना धारकास मराठी बोलता येणे आवश्यक असल्याची अट घालण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील इतर भागात सदर नियम लागू करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०३-०८-२०१७) :** (१) मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, नाशिक, औरंगाबाद व नागपूर महानगरपालिका क्षेत्रासाठी पहिल्या टप्प्यात ६०,००० रिक्षा परवान्यांचे लॉटरी पध्दतीने फेरवाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(२) व (३) सदर रद्द व व्यपगत ऑटोरिक्षा परवान्यांचे फेरवाटप करतान स्थानिक भाष येत असण्याबाबातची अट लागू करण्यात आली होती. तथापि, शासनाने दि.१७.०६.२०१७ च्या अधिसूचनेद्वारे ऑटोरिक्षा/टॅक्सी परवान्यावरील निर्बंध उठविलेले आहे. तसेच, सदर परवान्यांच्या वाटपाकरिता अटी व शर्ती दि.१८.०७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये भाषा विषयक कोणतीही अट नमूद केलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात मागासवर्गीय व अनुसूचित विद्यार्थ्यांसाठीची शिष्यवृत्ती मिळण्यास जातीच्या दाखल्याची अटीमुळे अडथळा निर्माण होत असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला काढला नसल्याबाबत**

**(५) ४६०८४ (२८-०४-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात मागासवर्गीय व अनुसूचित विद्यार्थ्यांसाठीची शिष्यवृत्ती मिळण्यास जातीच्या दाखल्याच्या अटीमुळे अडथळा निर्माण होत असल्यामुळे जिल्हयातील तब्बल ११ हजार १४५ विद्यार्थ्यांनी जातीचा दाखला काढला नसल्याने शिष्यवृत्तीमध्ये अडचण निर्माण होत आहे हेही खरे आहे काय,

(२) असल्यास, जातीचा दाखला नसल्याने जिल्हयातील ११ हजार १४५ विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार आहे हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तदनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे, नसलयास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२६-०७-२०१७)** :(१) होय.
(२) होय.
(३) व (४) ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत बहुतांश विद्यार्थ्यांकडे जातीचा दाखला नाही. सदर योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना लाभ घेता यावा म्हणून जातीच्या दाखल्याची अट रद्द करण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली असता, केंद्र शासनाने त्यांचे पत्र दि .१९.२.२०१६ अन्वये जातीच्या दाखल्याची अट शिथील करण्यात आली नसल्याचे कळविले आहे. त्यामुळे जिल्हयातील इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या सर्व विद्यार्थ्यांना जातीचा दाखला देणेसाठी विशेष कॅम्पचे आयोजन करणेबाबत मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना कळविणेत आले आहे.

___

### मुंबई महापालिकेकडून अंपगाच्या प्रलंबित मागण्यासंदर्भात कार्यवाही करण्याबाबत.

**(६) ४६५८६ (२८-०४-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिका क्षेत्रातील अंपगाच्या प्रलंबित मागण्यांबाबत प्रहार अंपग क्रांती आंदोलन मुंबई या संघटनेने दिनांक ९ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास हल्लाबोल आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रहार अंपग क्रांती आंदोलन मुंबई या संघटनेने मुंबई मनपा प्रशासनाकडे केलेल्या मागण्या काय आहेत,
(३) याबाबत राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी अपंग पुर्नवसन कायदा १९९५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे,
(४) मुंबई मनपा प्रशासनाने मुंबईतील अंपगांच्या प्रलंबित मागण्यांसदर्भात कोणती कार्यवाही केली आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रहार अपंग क्रांती आंदोलन, मुंबई या संघटनेने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केलेल्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत :-

- मुंबई महानगरपालिकेच्या प्रत्येक अर्थसंकल्पामध्ये अपंगांचा ३% निधी राखीव ठेवून तो अपंगांच्या कल्याणासाठी खर्च करण्यात यावा.
- महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार, जन्म-मृत्यु नोंदीप्रमाणे मुंबईतील अपंगांची नोंद महानगरपालिकेमध्ये करणे.
- १९९५ चा अपंग व्यक्ती कायदा मुंबई महानगरपालिकेमध्ये आहे तसा राबविणे.
- भूखंड निवासी व व्यापारी गाळे वाटपामध्ये कायद्याप्रमाणे १९९६ पासूनच्या अनुशेष ३ टक्के प्रमाणे भरुन काढावा.
- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांकडून नि:समर्थ असलेल्या व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या ३% निधीचे नियंत्रण करणेकरिता जिल्हा व तालुकास्तरावर लवकरात लवकर समिती गठीत करुन त्यामध्ये अपंगांना स्थान देण्यात यावे.
- मुंबई महानगरपालिकेमधील उपनगर व विभागनिहाय नागरी वस्ती विभागाला अपंगांच्या विविध यांना राबविण्यासाठी प्रभाग निहाय / वॉर्ड निकाय अधिकारी नेमण्यात यावा.
- मुंबई महानगरपालिकेमध्ये सायकल स्टॅण्ड पार्किंग, वाहनस्थळे, प्राधान्याने अपंगांना किंवा अपंग संस्थांना चालविण्यास देण्यात यावीत.
- बेस्ट बस प्रवास अपंगांना मोफत करुन मिळावा.
- मुंबई महानगरपालिका रुग्णालयांमध्ये अपंग आणि अपंगांच्या कुटुंबियांना मोफत वैद्यकीय सेवा देण्यात यावी.
- मुंबई महनगरपालिकेमधील सर्व शासकीय नियमशासकीय स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्ये, उद्यानांमध्ये, खाजगी इमारतीमध्ये अपंग मार्गिका (रॅम्प) करणे.

(३), (४) व (५) प्रहार अपंग क्रांती आंदोलन, मुंबई यांच्या निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत दिनांक २४.०२.२०१६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना महानगरपालिकेमार्फत संबंधितांना देण्यात आल्या आहेत.

---

### नविन ऑटोरिक्षा परवाने नुतनीकरण व वाटप करण्यासाठी मागविलेल्या ऑनलाईन अर्जाकरीता शासनाने घातलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याबाबत

**(७) ५०२४६ (२८-०४-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परिवहन विभागाने नविन ऑटोरिक्षा परवाने नुतनीकरण व वाटप करण्यासाठी मागविलेल्या ऑनलाईन अर्जाकरीता शासनाने घातलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिवकहन अधिका-यांनी संगनमताने परप्रांतियांना परवाने वाटप यादीत प्राधान्य देवून स्थानिक भुमीपुत्रांवर अन्याय केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकारामुळे परिवहन विभागाच्या यादीत पारदर्शकता यावी याकरीता प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे यांना निवेदन दिले गेले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५)असल्यास, चौकशीअंती परिवहन विभागाच्या यादीत पारदर्शकता येण्याबाबत तसेच दोषी व्यक्तींविरुध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०३-०८-२०१७) :** (१) व (२) दि.१२.०१.२०१६ रोजी ऑनलाईन लॉटरी पद्धतीने केलेल्या ऑटोरिक्षा परवानाच्या वितरणात अटी व शर्तीचे उल्लंघन झाले, ही बाब खरी नाही.

(३) अशा आशयाचे निवेदन प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांना प्राप्त झाले आहे.

(४) व (५) शासनाने दिनांक १७.०६.२०१७ च्या अधिसूचनेव्दारे ऑटोरिक्षा/टॅक्सी परवान्यावरील निर्बंध उठविले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विदर्भ-मराठवाडयासह २९ हजार गावांत दुष्काळ व तीव्र पाणी टंचाई समस्या असताना, औरंगाबाद येथील मद्य व बियरचे उत्पादन करण्या-या कारखान्यांनी हजारो कोटी लिटर पाणी वापरल्याबाबत**

**(८) ५४८५८ (२२-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विदर्भ-मराठवाडयासह २९ हजार गावांत दुष्काळ व पाणी टंचाई समस्या असताना, औरंगाबाद येथील १० मद्य व बियरचे उत्पादन करण्या-या कारखान्यांनी सुमारे २०० कोटी लिटर पाणी वापरल्याचे दिनांक १३ मे, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र औद्यिगिक विकास महामंडळातर्फे सदरहू १० कारखान्यांना १६ रुपये इतक्या कमी भावाने, १ हजार लिटर प्रमाणे दररोज ४० लाख लिटर पाणी पुरविण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालय आणि मा.सर्वोच्च न्यायालयाने कारखाने मालकांची पाणीपुरवठा मागणी फेटाळूनही अद्याप, राज्य शासनातर्फे कारखान्यांना पाणीपूरवठा कमी करणेबाबत, शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (०२-०८-२०१७) :** (१) हे अशंत: खरे आहे.
तथापि वाळुंज परिसरातील निवासी क्षेत्र, ग्रामपंचायती, सिडको यांच्या घरगुती वापरासही प्रतिदिन ५६ दशलक्ष लि. पाणी पुरवठा करण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
म. औ. वि. महामंडळातर्फे वाळूज, शेंद्रा येथील मद्य बियर उद्योगांना रु. ४२.५० व चिखलठाणा/ औरंगाबाद येथील मद्य व बियर उद्योगांना रु. ४५.५० प्र.घ.मी. पाण्याचा दर आकारण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
जनहित याचिका क्र. ६४/२०१५ बाबत मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २६/०४/२०१६ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार या उद्योगांना दिनांक २७/०४/२०१६ पासून ५० टक्के व दि. १०/५/२०१६ पासून ६० टक्के पाणी कपात करण्यात आली आहे. तसेच वरील अंतरिम आदेश दिनांक ०८/०८/२०१६ च्या आदेशान्वये रद्द केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जेष्ठ नागरिकांसाठी आखलेल्या सर्वसमावेशक धोरणाबाबत

**(९) ५७६८४ (२०-०८-२०१६). श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्यातील जेष्ठ नागरिकांसाठी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान आखलेल्या सर्वसमावेशक धोरणामध्ये नमूद केलेल्या १६ बाबींपैकी किती बाबींची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली आहे,
(२)असल्यास, उक्त बाबींच्या संदर्भातील माहिती जेष्ठ नागरिकांना व्हावी यासाठी त्यांची प्रसिध्दी कोणत्या माध्यमातून करण्यात आली आहे,
(३)असल्यास, संदर्भाधीन प्रश्न भाग (१) मध्ये नमूद केलेल्या बाबींचा लाभ संबंधित जेष्ठ नागरिकांना होतो किंवा नाही याचा आढावा घेण्याची शासनाने यंत्रणा निर्माण केली आहे काय?

**श्री. राजकुमार बडोले (०२-०८-२०१७) :**(१) संबंधित विभाग/कार्यालयाकडून सर्व बाबींची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(२) याबाबत होर्डिंग, वर्तमानपत्रे व लोकराज्य मासिकातून प्रसिध्दी देण्यात आली आहे.
(३) शासन निर्णय दि.२६/५/२०१६ अन्वये जेष्ठ नागरिक धोरणाची अंमलबजावणीबाबत आढावा घेण्यासाठी मा.मंत्री (सा.न्या.) व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समित्या गठीत करण्यात आलेल्या आहेत.

---

**राज्यातील विशेषतः ईशान्य मुंबईच्या पश्चिम एम/ईस्ट व एम/वेस्ट या नागरी प्रभाग क्षेत्रातील रस्त्यांची दुरुस्ती व देखभाल करण्याबाबत**

**(१०) ५९४०३ (०२-०८-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषतः ईशान्य मुंबईच्या पश्चिम एम/ईस्ट व एम/वेस्ट नागरी प्रभाग क्षेत्रातील धोकादायक व अति धोकादायक निवासी, झोपडपट्टी व निमनागरी संकुलातील घरांच्या संदर्भात पावसाळी हंगामापूर्वी पायवाटा-जोड रस्ते तसेच दुर्गम आडवळणातील मार्गिका, जोड-रस्ते, मुख्य रस्ते तसेच दळणवळणाच्या दृष्टीकोनातून महत्वपूर्ण असलेल्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती व देखभाल विषयक प्रलंबित कामे वेळीच पूर्ण करण्याबाबतची मागणी स्थानिक रहिवाशी संघटना, लोकप्रतिनिधी तसेच स्थानीक रहिवाशी संघाच्या प्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री (नगरविकास), राज्यमंत्री (नगरविकास), अतिरिक्त मुख्य सचिव (नगरविकास) संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त तथा नगरविकास आयुक्त तसेच संबंधित प्राधिकरणाचे आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दिनांक २० मे , २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास प्रश्नोक्त भाग (१) प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०८-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभगातील पर्जन्य जलवाहिन्या दुरुस्ती व देखभाल, पायवाटा व मार्गिका दुरुस्ती व सुधारणा इत्यादी प्रभागनिहाय दुरुस्तीची कामे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय तरतुदीत महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार करण्यात येतात.

एम/पश्चिम विभागांतर्गत असलेल्या निवासी झोपडपट्टी व निमनागरी संकुलातील पायवाटा, मार्गिका, जोडरस्ते तसेच दळणवळणाच्या दृष्टीकोनातून असलेल्या रस्त्यांची कामे आवश्यकतेनुसार व उपलब्ध निधीतून वेळोवेळी करण्यात येतात.

तसेच स्थानिक नगरसेवकांनी सुचविल्यानुसार झोपडपट्टीमधील अंतर्गत पायवाटा, जोडरस्ते इ. कामे विभागस्तारावर करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय पुसद येथील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याना सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम अदा करण्याबाबत**

**(११) ६१७२१ (२०-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय पुसद येथील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम अदा करण्यात विलंब होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सचिव,सामाजिक न्याय आणि मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे माहे मे, २०१५ आणि २०१६ दरम्यान निदर्शनास आणून दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या कामी दफ्तर दिरंगाई करणारे सहाय्यक आयुक्त श्री विजय साळवे यांचेवर तत्काळ निलंबनाची कारवाई करण्याचीही मागणी करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (०२-०८-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) याबाबत शासनाने आदेश दि.१८/११/२०१६ अन्वये संबंधित सहाय्यक आयुक्त, श्री.विजय साळवे यांना निलंबित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यड्राव (जि. कोल्हापूर) येथील प्रोसेसमधून येणा-या दूषित पाण्यासंदर्भात इ.टी.पी. कार्यान्वित करण्याबाबत**

**(१२) ६५८८८ (१६-१२-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यड्राव (जि. कोल्हापूर) येथील प्रोसेसमधून येणा-या दूषित पाण्यासंदर्भात संबधित प्रोसेसधारकांना इ.टी.पी. कार्यान्वित करण्यासाठी दिनांक ९ ऑगस्ट,२०१६ रोजीपर्यत डेडलाईन देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर डेडलाईन नुसार किती प्रोसेसधारकांनी इ.टी.पी. कार्यान्वित केली आहे, याबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम (०३-०८-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या अंतरीम आदेशास अनुसरुन त्रुटी आढळून आलेल्या सर्व ६ कापड उदयोगांनी अदयावत सांडपाणी प्रक्रीया यंत्रणा उभारली असून सदर यंत्रणा सद्यस्थितीत कार्यान्वीत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवतनाही.

---

**अंबरनाथ मधील एम.आय.डी.सी. कारखान्यांमधून सांडपाण्याची प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत**

**(१३) ६७९८६ (१६-१२-२०१६). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१)अंबरनाथ मधील एम.आय.डी.सी. कारखान्यांमधून सांडपाण्याची प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत तीन महिन्यापासून तोडगा निघाला नसल्याने या कंपन्यातील जवळपास वीस हजार कर्मचाऱ्यांचे भवितव्य वेठीस लागले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कल्याण अंबरनाथ येथील एम.आय.डी.सी. परिसरातील कंपन्यांकडून सांडपाणी प्रकल्प योग्यरित्या राबवला जात नसल्याने मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रशासनाने यावर कोणती उपाय योजना केली वा करत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (०३-०८-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) मा. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांनी दाखल केलेल्या पुनर्विलोकन याचिकेच्या सुनावणीदरम्यान दि.३०.३.२०१६ रोजी सदरहू परिसरातील उद्योगांकडून सामायिक सांडपाणी प्रक्रीया केंद्रामुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबत आक्षेप नोंदविले आहेत. मा.राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांनी दाखल याचिकासंदर्भात दि. २.७.२०१५ रोजी अंबरनाथ सह ४ सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या सांडपाण्याच्या प्रक्रियेमध्ये आमुलाग्र बदल करण्याच्या दृष्टीने दिलेल्या निर्देशानुसार विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने वेळोवळी आढावा घेऊन सर्व संबंधित संस्था व प्रशासकीय विभाग यांचा समन्वय साधून उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच तक्रार निवारण करण्याकरीता पाहणी समिती (MONITORING COMMITTEE) स्थापन करण्यात आली आहे. त्याप्रमाणे मागील एक वर्षात अंबरनाथ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प संदर्भात तक्रार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झालेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या सरासरी दरडोई उत्पन्नाच्या तुलनेत आदिवासींचे सरासरी उत्पन्न तब्बल कमी असल्याबाबत**

**(१४) ६९२५९ (०१-०१-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सरासरी दरडोई उत्पन्नाच्या तुलनेत आदिवासींचे सरासरी उत्पन्न तब्बल ७० हजारांनी कमी असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दर शंभर आदिवासी कुटूंबापैकी ९१ आदिवासी कुटूंबे दारिद्रय रेषेखाली असल्याचे एका स्वयंसेवी संस्थेच्या अहवालातून समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन राज्यातील आदिवासींचा सर्वागिण विकास होऊन त्यांचे दरडोई उत्पन्न वाढावे यासाठी कृती आराखडा तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०८-२०१७) :** (१) आदिवासी विकास विभागाकडे अशी कुठलीही निवेदन/माहिती प्राप्त नाही.

(२) अशा प्रकारच्या कोणत्याही स्वयंसेवी संस्थेचा अहवाल आदिवासी विकास विभागाकडे प्राप्त झालेला नाही.

(३) राज्यातील आदिवासी लोकांच्या सर्वांगिण विकासासाठी आदिवासी उपयोजनेअंतर्गत या विभागामार्फत विविध योजनांचा लाभ दिला जातो. ज्यामध्ये सामूहिक व वैयक्तिक योजनांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कुरुडगी (बु) ता. देगलुर, जि. नांदेड) येथील कोल्हापुरी पध्दती बंधाऱ्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव**

**(१५) ७०५३४ (१६-१२-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुरुडगी (बु) ता. देगलुर, जि. नांदेड) येथील कोल्हापुरी पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक शासनाकडे मंजुरीस्तव सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजुरीबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२९-०६-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मा.सर्वोच्च न्यायालयाचे अंतरिम आदेश असतांनाही धर्मादाय आयुक्तांनी ट्रस्टना जमीन विक्री करण्यास अनुमती दिल्याबाबत

**(१६) ७०६८२ (१६-१२-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वक्फ बोर्डाच्या अखत्यारितील अल्पसंख्यांक ट्रस्टच्या जमीनीची विक्री करता येणार नाही असे मा.सर्वोच्च न्यायालयाचे अंतरिम आदेश असतांनाही धर्मादाय आयुक्तांनी अनेक ट्रस्टना जमीनी विक्री करण्यास सन २०१४ ते २०१६मध्ये वा त्या दरम्यान अनुमती दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाचा अवमान झाल्याप्रकरणी ट्रस्टने केलेल्या जमीन विक्री वा भाडेपट्ट्याने जमीनी देण्याचा व्यवहार रद्द करण्याबाबत शासनाने आतापर्यंत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०७-२०१७) :** (१) अशंतः खरे आहे. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी शासनास सादर केलेल्या अहवालानुसार त्यांनी सन २०११-१२ ते २०१५ मध्ये एकूण ३३ मुस्लीम विश्वस्त संस्थांच्या मिळकतीच्या विक्रीस परवानगी दिलेली आहे. यामध्ये ८ वक्फ संस्थांचा समावेश असल्याचा वक्फ मंडळाकडून अहवाल प्राप्त झाला आहे.
(२) मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती ३९२८८-३१२९०/२०११ प्रकरणी दि.११.५.२०१२ रोजी दिलेल्या निर्णयान्वये धर्मादाय आयुक्त वा वक्फ मालमत्तांच्या व्यवस्थापनाशी संबंधित कोणत्याही अधिकाऱ्याने वक्फ मालमत्तेविषयी दायित्व निर्माण करुन, किंवा वक्फ मालमत्तेचे अन्यसंक्रामण करु नये, असे आदेशित केले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे प्रतिबंध केल्यानंतरही धर्मादाय आयुक्तांकडून वक्फ मालमत्तेच्या विक्रीस परवानगी देणे सुरु आहे किंवा कसे या बाबीची तपासणी करुन, आवश्यक असल्यास मा.सर्वोच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल करण्याविषयी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याबाबत वक्फ मंडळाला सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र सावकारी (नियम) २०१४ हा कायदा २०१४ पासून लागू करताना अंमलबजावणी मर्यादा ३० वर्षे करण्याबाबत**

**(१७) ७३८९० (२१-०४-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सावकारी (नियम) २०१४ हा कायदा २०१४ पासून लागू करताना अंमलबजावणी पासून पाच वर्षे अगोदरची प्रकरणे या कायद्याच्या चौकटीत आणण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या या निर्णयामुळे अनेक शेतकरी न्यायापासून वंचित राहतील अशी भिती व्यक्त करुन सावकारग्रस्त शेतकरी समितीने ही मर्यादा ३० वर्षे करण्याची मागणी मा.सहकार मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी दिनांक १५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यादरम्यान मा.सहकार मंत्री यांचेकडे पत्र पाठवून ही मर्यादा ३० वर्षे करण्यात यावी, अशी विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२७-०७-२०१७) :** (१) अंशत: खरे.

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ या कायद्यातील कलम १८(१) मध्ये, कलम १६ खालील पडताळणीच्या दिनांकापासून किंवा कलम १७ खालील तपासणीच्या दिनांकापासून अथवा कर्जदाराच्या अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून ५ वर्षाच्या आतील प्रकरणांचा समावेश होईल अशी तरतुद कायदा लागू करताना करण्यात आली होती.

(२) होय.

(३) होय.

(४) दि. २५.०६.२०१४ च्या अधिनियमातील सुधारणेनुसार कालमर्यादा ५ वर्षावरून १५ करण्यात आली आहे. त्यावेळेस अशी मर्यादा दिर्घकाळ मागे घेतल्यास त्यामध्ये अंमलबजावणीच्या दृष्टीने अडचण निर्माण होईल असे लक्षात आल्यामुळे जाणीवपुर्वक ५ वर्षाची कालमर्यादा १५ वर्षापर्यंत वाढविण्यात आली आहे. सावकारी कालमर्यादा वाढविण्याबाबत सद्यस्थितीत शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईसह राज्यामध्ये खुलेआम गुटख्याची विक्री केली जात असल्याबाबत

**(१८) ७४३६५ (२०-०४-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१२ पासून गुटख्याच्या उत्पादन व विक्रीवर बंदी लागू केली असली तरी मुंबईमध्ये खुलेआम गुटख्याची विक्री केली जात असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) गत चार वर्षात मुंबई शहरातील ५ हजाराहून अधिक दुकानांतून रूपये ९० कोटींहून अधिक किंमतीचा गुटख्याचा साठा जप्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अन्न दर्जा आणि सुरक्षा कायदा, २००६ अन्वये सन २०१२ मध्ये संपूर्ण राज्यभरात गुटख्याच्या उत्पादन व विक्रीवर आणलेल्या बंदीची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यात तसेच मुंबईमध्ये गुटख्याची विक्री व साठवणूक करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (०२-०८-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) बृहन्मुंबई विभागाने दि.२० जुलै, २०१२ ते एप्रिल २०१७ या कालावधीत एकूण ९२१० ठिकाणी भेटी दिल्या असता ५४६ ठिकाणी प्रतिबंधित अन्न पदार्थांचा अंदाजे किंमत रु.१२.७९ कोटी किंमतीचा साठा जप्त केला आहे.

राज्यात गुटखा बंदी लागू झाल्यापासून एकूण ८५१४८ पेढयांची क्षेत्रिय कार्यालयाने तपासणी केली असता ५५१८ पेढयांमध्ये प्रतिबंधीत अन्नपदार्थांचा साठा आढळून आला त्या अनुषंगाने सुमारे रु. १०१.२९ कोटी किंमतीचा गुटखा व तत्सम प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त केला आहे. ३७१९ प्रकरणी राज्यातील विविध पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दोषींविरुध्द राज्यातील विविध न्यायालयात एकूण ३३५४ खटले दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरामध्ये प्लॉस्टिकचा कोबी बाजारात विकला जात असल्याबाबत

**(१९) ७४६९२ (२०-०४-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये प्लॉस्टिकच्या कोबी बाजारात विकला जात असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्याची तक्रार राज्याचे माहिती आयुक्त यांनी राज्याचे मुख्य सचिव व अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्लॅस्टिकचा कोबी मलबार हिल येथील नेपियन्सी रस्त्यांवरील हैद्राबाद इस्टेटमधील सहकार भांडारमधून विकत घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने प्लॅस्टिकचा भाजीपाला बनविणारे व उक्त मालाची मार्केटमध्ये विक्री करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (०२-०८-२०१७) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

राज्य माहिती आयुक्त यांनी whats app

द्वारे या प्रकरणीची तक्रार अन्न सुरक्षा आयुक्त यांचेकडे केली. अशा प्रकारची कोणतीही इतर लेखी तक्रार प्रशासनास प्राप्त झालेली नाही.

(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाने चौकशी करुन संबंधित हैद्राबाद इस्टेटमधील सहकार भांडारमधून २ नमूने घेऊन विश्लेषणासाठी पाठविले असून, त्यांचे अहवाल प्रमाणित आले आहेत. तसेच मुंबईतील इतर सहकार भांडारमधून ५ नमूने घेऊन विश्लेषणासाठी पाठविले असता ते सर्व नमूने प्रमाणित घोषीत करण्यात आले आहेत.

तपासात प्लास्टीकचा कोबी अथवा इतर भाजीपाला बनविणारे आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यभरातील मॅकडोनल्डस व अन्य फूड जॉइंटस, मॉल, मल्टिप्लेक्समध्ये शीतपेय, कॉफी ग्राहकांना देताना कॅफेन असल्याची माहिती ग्राहकांना देणे बंधनकारक असल्याबाबत**

**(२०) ७४८८८ (२०-०४-२०१७). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मॅकडोनल्डस व अन्य फूड जॉइंटस, मॉल, मल्टिप्लेक्समध्ये शीतपेय, कॉफी कागदी कपातून ग्राहकांना विकली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने राज्यातील मॅकडोनल्डस व अन्य फूड जॉइंटस, मॉल, मल्टिप्लेक्समध्ये शीतपेय, कॉफी ग्राहकांना देताना कॅफेन असल्याची माहिती ग्राहकांना देणे बंधनकारक असल्याचे आदेश दिल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त आदेशाची अंमलबजावणी करुन त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०२-०८-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) ग्राहकांना कागदी कपातून शितपेय विक्री करतांना ज्या शितपेयात कॅफेन टाकले जाते अशा कागदी कपांवर त्याबाबत माहिती देणे बंधनकारक आहे, असे आदेश अन्न सुरक्षा आयुक्त यांनी दि.६.१.२०१७ रोजी सुधारणा नोटीसच्या अनुषंगाने केलेल्या अपील प्रकरणी दिले आहेत. आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत राज्यातील सर्व सह आयुक्त (अन्न) यांना ज्ञापनाद्वारे कारवाई करण्याबाबत देण्यात आले व नियमानुसार अशा प्रकारच्या उल्लंघनाबाबत कारवाई घेण्यात येते.

राज्यातील एकूण ५८ तपासण्या करुन त्यापैकी २४ ठिकाणी कॅफेनयुक्त बेवरेज आढळले. सदर सर्व ठिकाणी सुधारणा नोटीस देऊन सदर कॅफेनयुक्त शीतपय विक्री करण्यास बंदी घालण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण भागात स्वच्छता अभियानांतर्गत शौचालय बांधण्याकरिता देण्यात येणा-या निधीमध्ये वाढ करण्याबाबत

**(२१) ७४९७९ (२०-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागात स्वच्छता अभियानांतर्गत शौचालय बांधण्याकरिता देण्यात येणा-या निधीमध्ये वाढ करण्याची मागणी पनवेल परिसरातील ग्रामीण भागातील नागरिकांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान संबधित अधिका-यांकडे केली, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०८-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी येथील मे.ग्लॅक्सो स्मिथक्लाईन या औषध उत्पादन कंपनीने मागणीप्रमाणे रॅबीपूर इंजेक्शन देण्यास दिलेला नकार

**(२२) ७५१२२ (२०-०४-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल),**

**श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी येथील मे.ग्लॅक्सो स्मिथक्लाईन या औषध उत्पादन कंपनीकडे अंधेरी (मुंबई)येथील मे.नॉर्थ वेस्ट फार्मा हब या पेढीने रॅबीपूर नावाचे इंजेक्शनची मागणी केली परंतु मे.ग्लॅक्सो या कंपनीने इंजेक्शन देण्यास नकार दिल्या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने उक्त कंपनीवर कारवाई केल्याची बाब दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे. ग्लॅक्सो स्मिथक्लाईन औषध उत्पादन कंपनी औषधांचा साठा अवैधरीत्या राज्यातील अन्य खरेदीदारांना अधिक किंमतीत विक्री करीत असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औषध (किंमत नियंत्रण) कायद्यातंर्गत संबंधित उत्पादन कंपनीकडे मागणी केलेल्या औषधांचा साठा उपलब्ध असल्यास तो देण्यास नकार देणे हा गुन्हा मानला जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (०२-०८-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

मे. ग्लॅक्सो स्मिथक्लाईन फार्मास्युटीकल्स लि., भिवंडी, जिल्हा ठाणे या औषध उत्पादन कंपनीकडे मे. नॉर्थ वेस्ट फार्मा हब, अंधेरी, मुंबई यांनी रॅबीपूर नावाचे इजेक्शनची मागणी केली होती. सदर कंपनीने इजेक्शन देण्यास नकार दिल्याप्रकरणी दि. १६.१२.२०१६ रोजी कारवाई करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) परवानाधारक पेढीने औषधाची मागणी केली असता ती उपलब्ध असून, पुरवठा करण्यास नकार दिल्यास औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ मधील परिच्छेद २८ चे उल्लंघन होते.

(४) मे. ग्लॅक्सो स्मिथक्लाईन फार्मास्युटीकल्स लि., भिवंडी, जिल्हा ठाणे या औषध उत्पादन कंपनीकडे मे. नॉर्थ वेस्ट फार्मा हब, अंधेरी, मुंबई यांनी रॅबीपूर नावाचे इजेक्शनची मागणी केली. परंतु, सदर कंपनीने इजेक्शन देण्यास नकार दिल्याप्रकरणी संबंधितांविरुध्द भिवंडी तालुका पोलीस स्टेशन, ठाणे (ग्रामीण) येथे गुन्हा क्र. ॥ ३७/ २०१६, दि. १६.१२.२०१६ रोजी गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हाच्या अनुषंगाने तपासाची मुळ कागदपत्रे पोलीसांकडे देण्यात आली आहे. अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत कलम १० (७)(३), सहवाचन औषधे किंमत नियंत्रण आदेश २०१३ चे परिच्छेद २८ चे उल्लंघन केले असल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**राज्यातील वाहन मालकांना वाहन नोंदणी पुस्तिका स्मार्ट कार्ड स्वरूपात देण्याबाबत**

**(२३) ७७०६३ (१३-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील, वाहन मालकांना, अद्यापही वाहन नोंदणी पुस्तिका स्मार्ट कार्ड स्वरूपात, शासनाने निर्णय घेवूनही, देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त, वाहन नोंदणी पुस्तिका स्मार्ट कार्ड स्वरूपात उपलब्ध करून देण्याबाबत अदयापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिवाकर रावते (०२-०८-२०१७) :** (१) व (२) राज्यातील सर्व परिवहन कार्यालयामध्ये नोंद झालेल्या वाहनांना सन २००६ पासून स्मार्ट कार्ड स्वरुपातील नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येत होते. सेवापुरवठादारासोबतचा करार डिसेंबर २०१४ मध्ये संपुष्टात आला. नविन सेवापुरवठादार निवड प्रक्रियेस न्यायालयीन प्रकरणामुळे विलंब झाला. न्यायालयाच्या परवानगीनंतर निविदा प्रकिया पूर्ण करण्यात आली असून सेवापुरवठादाराची निवड करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवतनाही.

---

**मुंबई, ठाण्यातील बाजारात पांढ-या वाटाण्याला हिरवा रंग देवून ग्राहकांची होत असलेली फसवणूक**

**(२४) ७७५८३ (२०-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाण्यातील बाजारात पांढ-या वाटाण्याला हिरवा रंग देवून ग्राहकांची फसवणूक करणा-या विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मागणी राज्य शासनाने सहायक आयुक्त, अन्न व औषध विभाग यांना दिनांक २१ डिसेंबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी विक्रेता व व्यापा-यांविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, अन्न धान्य, भाजीपाला यांना रंग देवून ग्राहकांची फसवणूक होवू नये याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (०२-०८-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवतनाही.

(३) अन्न धान्य, भाजीपाला यांना रंग देवून विक्री केल्याबाबत एकही घटना राज्यात निर्दशनास आलेली नाही. अन्न सुरक्षा व मानदे कायद्यांतर्गत अन्न व औषध प्रशासनातर्फे

नियमितपणे अन्नधान्य व भाजीपाला तसेच इतर अन्न पदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येतात व नियमानुसार कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वडिवळे (ता.मावळ, जि.पुणे) धरणाची झालेली दुरवस्था**

**(२५) ७७७०८ (१५-०४-२०१७). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडिवळे (ता.मावळ,जि.पुणे) धरण सुमारे १.४४ टी.एम.सी. असून धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास,सदर धरणाची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार पाणी गळती थांबविण्याबाबत व धरणाचे बांधकाम करणाऱ्या एजन्सीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

धरणात सुमारे ४०.८७ दलघमी पाणीसाठा होत असून त्यातून मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत आहे.

(२) अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांनी दि. ११/०९/२००८ रोजी धरणाची पाहणी केली व गळती बाबतचा अभ्यास/अहवाल सादर केला.

(३) गळती थांबविण्यासाठी विशेष दुरुस्ती अंतर्गत अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव दि. २६/०१/२०१४ रोजी सादर करण्यात आले होते. दरम्यान केंद्रीय जल व विद्युत अनुसंधान संस्था (CWPRS) पुणे यांनी गळती प्रतिबंधक उपाययोजनाचा अहवाल सादर केला आहे. शासनाच्या दि. १७/११/२०१६ च्या शासन निर्णयानुसार महामंडळास मिळणाऱ्या पाणीपट्टीच्या रक्कमेतून हे काम प्रथम प्राधान्याने हाती घेण्याचे नियोजन आहे.

निविदा शर्ती व तांत्रीक बाबींचा विचार करुन कंत्राटदारावर कार्यवाही करण्यासंदर्भात उचित कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कानडी बंधाऱ्यानजीक असलेल्या घटप्रभा नदीवरील कोल्हापुरी टाईप बंधाऱ्यांवरील रस्ता खचून गेल्याबाबत**

**(२६) ७८६७५ (१७-०४-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कानडी बंधाऱ्यानजीक असलेल्या घटप्रभा नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्यांवरील रस्ता खचला असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार खचलेला रस्ता दुरुस्त करणेबाबत व महापुरात वाहून गेलेले बंधारे पूर्ववत बांधणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३१-०७-२०१७) :** (१), (२) व ३) नाही, हे खरे नाही.
सदर को.प.बंधारा सुस्थितीत असून बंधा-यावरील वाहतुकीसाठीचा स्लॅब तसेच दोन्ही बाजूचे पोहोच रस्ते सुस्थितीत आहेत. बंधा-याच्या डाव्या तीरावरील नदीचा अधोबाजूचा काठ तसेच उजव्या तीरावरील नदीच्या उर्ध्वबाजूच्या काठाची प्रवाहामुळे धुप झाली आहे. परंतु यामुळे बंधा-यास कोणताही धोका संभवत नाही. धूप रोखणेसाठी संरक्षक भिंत बांधणे प्रस्तावित असून सदर दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक तयार करणेचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सहकारी सूतगिरण्यांच्या संदर्भात सुधारित धोरण ठरविण्यासाठी वस्त्रोद्योग मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीबाबत**

**(२७) ७८७८३ (२१-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.अनिल कदम (निफाड), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सहकारी सूतगिरण्यांच्या संदर्भात सुधारित धोरण ठरविण्यासाठी वस्त्रोद्योग मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीचे सदस्य कोण आहेत व समितीची कार्यकक्षमता काय आहे,
(३) असल्यास, सदर समितीला अहवाल तयार करण्यासाठी किती मुदत देण्यात आली आहे?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०८-२०१७) :** (१) हे खरे नाही. तथापि राज्यातील सहकारी सूतगिरण्यांच्या नोंदणीबाबत धोरण ठरविण्यासाठी मा.मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय दि.२७.१२.२०१६ रोजी राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे.

(२) व (३) सहकारी सूतगिरणी नोंदणीबाबतची प्रकरणे दि.१६.३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन केलेल्या समितीसमोर सादर करण्यात येत असून सदर समितीमध्ये मा. श्री. सुभाष देशमुख, मंत्री (वस्त्रोद्योग), अध्यक्ष, मा. श्री. जयकुमार रावल, मंत्री (रोजगार हमी व पर्यटन), सदस्य, मा. श्री. संभाजी पाटील निलंगेकर, मंत्री (कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास व माजी सैनिकांचे कल्याण), सदस्य, मा. श्री. दिपक केसरकर, राज्यमंत्री (गृह ग्रामिण, वित्त व नियोजन), सदस्य, अपर मुख्य सचिव (वित्त), सदस्य व प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), सदस्य सचिव हे सदस्य आहेत.

सहकारी सूतगिरण्यांच्या नोंदणीसाठी प्राप्त झालेले प्रस्ताव अध्यक्षांच्या परवानगीने समितीची बैठक आयोजित करुन समितीसमोर सादर करण्यात येऊन सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने अभ्यास करुन सूतगिरणी नोंदणीच्या अनुषंगाने सुधारीत धोरण ठरविण्यासाठी समिती शिफारस करील.

---

## नाशिक येथील प्रादेशिक परिवहन विभागाने ग्रामिण भागात सुरु असलेली छावणी कार्यालये बंद केल्याबाबत

**(२८) ७८८०२ (१३-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील प्रादेशिक परिवहन विभागाने नाशिक जिल्हयातील ग्रामिण भागामध्ये सुरु असलेली छावणी कार्यालये (कॅम्प) बंद केले आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे छावणी कार्यालये बंद करण्यामागील या विभागाचा निश्चित उद्देश काय आहे,

(३) असल्यास, सदर छावणी कार्यालये बंद असल्यामुळे ग्रामिण भागातील जनतेला फ़ार मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने छावणी कार्यालये पुर्ववत सुरु करावेत अशा प्रकारची मागणी माहे डिसेंबर, २०१६ व जानेवारी, २०१७ वा त्यादरम्यान निवेदनाव्दारे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर छावणी कार्यालये पुर्ववत सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०२-०८-२०१७) :** (१), (२), (३) व (४) जानेवारी, २०१७ पासून सारथी ४.० व वाहन ४.० ही नविन संगणक प्रणाली प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. या संगणक प्रणालीमध्ये सर्व कामकाज ऑनलाईन करणे अपेक्षित आहे. त्याकरिता संगणक व इतर आवश्यक उपकरणे छावणी कार्यालयाच्या ठिकाणी उपलब्ध होईपर्यंत म्हणजे फेब्रुवारी व मार्च २०१७ या कालावधीत शिबीर कार्यालयाचे कामकाज बंद

ठेवण्यात आलेले होते. शिबीर कार्यालये पूर्ववत सुरु करण्याबाबत फेब्रुवारी २०१७ मध्ये मागणी करण्यात आली होती. दि.०१.०४.२०१७ पासून शिबीर कार्यालयांचे कामकाज पूर्ववत सुरु करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवतनाही.

---

**अमरावती शहरातील राधानगरात अनंत सुपर मार्केटमधून खरेदी केलेल्या पाकीटबंद "सोया भेळ" मध्ये झुरळ आढळल्याबाबत**

**(२९) ७९१५१ (२०-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती शहरातील राधानगरात अनंत सुपर मार्केटमधून खरेदी केलेल्या पाकीटबंद कोरड्या "सोया भेळ" मध्ये झुरळ आढळून आल्याची तक्रार दिनांक २८ डिसेंबर,२०१६ रोजी वा त्या सुमारास स्थानिक औषधी प्रशासन विभागाकडे आलेली आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उपरोक्त "सोया भेळ" ज्या कंपनीची आहे त्या कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०२-०८-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर तक्रारीत नमूद पेढीची दि. २८.१२.२०१६ रोजी तपासणी करुन सोया भेळ (लाईट एन फिट) या अन्न पदार्थाचा नमूना विश्लेषणार्थ घेण्यात आला. सदर नमूना Free from insects & its infestation असल्याचे घोषीत झाला आहे. तथापि, तपासणी दरम्यान सदर उत्पादकाचा अन्न पदार्थाचा लेबलवर आढळून आलेल्या त्रुटीच्या अनुषंगाने उत्पादक कंपनीविरुध्द न्यायनिर्णय अधिकारी, अमरावती यांचेकडे न्यायनिर्णय करीता अर्ज क्र. १९ /१७ दि.०६/०३/२०१७ रोजी दाखल केलेला आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनेक हातगाडे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या परवान्याशिवाय खाद्यपदार्थ विक्री करीत असल्याबाबत**

**(३०) ७९१८० (२०-०४-२०१७). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनेक हातगाडे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या परवान्याशिवाय खाद्यपदार्थ विक्री करीत असून हातगाडयावर बनविण्यात आलेले खाद्यपदार्थ

खाल्ल्याने नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिका क्षेत्रामध्ये असे किती हातगाडे अन्न व औषध प्रशासन विभागाकडे नोंदणीकृत आहेत,

(३)असल्यास, उक्त खाद्य पदार्थ बनवून राहिलेल्या कचऱ्यामुळे या गाडयाभोवती भटकी कुत्री व डुकरांचा वावर वाढल्याने त्याचा त्रास नागरिकांना होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने अनधिकृत हातगाड्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. गिरीश बापट (०२-०८-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) सांगली महानगरपालिका क्षेत्रामध्ये ९५८ हातगाडे, चहा, वडापाव, चायनीज सेंटर, भेळ पाणीपुरी सेंटर इ. स्ट्रीट फुड व्हेंडॉर अन्न व औषध प्रशासन विभागाकडे नोंदणीकृत आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) अनधिकृत हातगाडयांबाबत अन्न सुरक्षा मानदे कायदयाच्या परिशिष्ट ४ चा भंग आढळून आल्यास तडजोड प्रकरणे दाखल करुन दंड आकारणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंजनगाव सुर्जी(जि.अमरावती) पंचायत समिती अंतर्गत 'स्वच्छ भारत' अभियानात झालेला गैरव्यवहार

**(३१) ७९३९१ (२०-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) पंचायत समिती अंतर्गत 'स्वच्छ भारत' अभियानांतर्गत शौचालय बांधकामास निकृष्ट दर्जाचे साहित्य अधिकाऱ्यांच्या संगनमताने कंत्राटदाराकडून वापरले जात असल्याचे दिनांक २६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०८-२०१७) :** (१) स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) या योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लाभार्थ्यांने स्वत: शौचालयाचे बांधकाम पूर्ण केल्याबाबत माहिती दिल्यानंतर शौचालयाच्या किमान निकषानुसार कनिष्ठ अभियंता यांच्याकडून तपासणी केली

जाते व तद्नंतर रुपये १२,०००/- बक्षिसपर प्रोत्साहन निधी दिला जातो. ग्रामपंचायत किवा पंचायत समिती कार्यालयाकडून कोणत्याही कंत्राटदाराची नेमणूक करण्यात येत नाही. त्यामुळे निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्याचा प्रश्नच उद्भवतनाही.
तथापि, दिनांक २६.१.२०१७ रोजी ग्रामपंचायत भंडारज, ता. अंजनगावसुर्जी येथील शौचालय बांधकामाचे संदर्भात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्याबाबत व कंत्राटदारास काम दिल्याबाबत दैनिक देशोन्नती यांनी वृत्त प्रकाशित केले होते. सदर वृत्ताच्या अनुषंगाने चौकशी केली असता त्यामध्ये तथ्य आढळून आले नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बिगरशेती नागरी पतसंस्था कर्जवाटप करताना लागू असलेल्या उपविधीमधील तरतुदींचे पालक करत नसल्याबाबत**

**(३२) ७९३९७ (२१-०४-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सध्या १५ हजार १८२ बिगरशेती नागरी पतसंस्था असून या पतसंस्थांनी सामान्य नागरिकांकडून मोठया प्रमाणावर ठेवी जमा केल्या असून कर्जवाटप करताना त्यासाठी लागू असलेल्या उपविधीमधील तरतुदींचे पालन करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणास्तव सामान्य ठेवीदार अडचणीत आले आहेत हे लक्षात घेता शासनाने चौकशी करुन कोणती आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०८-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) राज्यात एकूण १४,५७७ बिगरशेती नागरी सहकारी पतसंस्था असून त्यापैकी ७६ पतसंस्थांनी कर्ज वाटप करताना मंजूर उपविधीचे पालन केलेले नाही.
वरील ७६ पतसंस्थांपैकी ३६ पतसंस्थांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. सदर ३६ पतसंस्थांपैकी ९ पतसंस्थांच्या एकूण १११ संचालक / अधिकारी / कर्मचारी यांचेवर रु. ४३.३८ कोटी इतक्या रक्कमेची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून त्यापैकी १४ व्यक्तींकडून रु. १०.५९ लक्ष इतक्या रक्कमेची वसूली करण्यात आलेली आहे. उर्वरीत रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
उर्वरीत ४० पतसंस्थांपैकी २० पतसंस्थांचे अधिनियमाच्या कलम ८३ नुसार चौकशी करणेचे आदेश देण्यात आले असून १९ पतसंस्थांचे अधिनियमाच्या कलम ८२ अन्वये चौकशी करणेचे आदेश पारित केलेले आहेत व १ पतसंस्थेस अधिनियमाच्या कलम ७९ अन्वये विवरणपत्रे सादर करणेबाबत आदेश देण्यात आले आहेत.

उपरोक्त ७६ पतसंस्थांपैकी २६ पतसंस्थावर गुन्हे दाखल करण्यात आले असून प्रकरणी पोलिसांमार्फत पुढील तपासाची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवतनाही.

---

**धुळे शहरातील जवाहर वैदकीय महाविद्यालय आणि परिचारिका महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना झालेली विषबाधा**

**(३३) ७९६६७ (२०-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)धुळे (जि.धुळे) शहरातील जवाहर वैदयकीय महाविद्यालय आणि परिचारिका महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान अन्नातून विषबाधा झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्याची मागणी करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. गिरीश बापट (०२-०८-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता सदरचा प्रकार दुषित पिण्याच्या पाण्यामुळे झाल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

वसतीगृहाच्या भोजनालयातील तपासणीच्यावेळी आढळलेल्या स्वच्छतेबाबतच्या त्रुटीबाबत व इतर दोषाबाबत न्यायनिर्णय खटला क्र.३७/२०१७ दाखल करण्यात आला होता. सदर न्यायनिर्णयात वसतीगृह व्यवस्थापनास रु.४०,०००/- एवढा दंड झाला आहे.
(४)प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ अकोला यांचेकडून जि.प.अकोला यांना हस्तपुस्तिका पुरवठ्याबाबत**

**(३४) ७९७९४ (२१-०४-२०१७). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यवस्थापक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ (MSSIDC) अकोला यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांचे कडून सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वाचन-

लेखन प्रशिक्षण हस्तपुस्तिका छपाईबाबत जि.प.पत्र क्र. ३१३/१३/दिनांक १९/९/२०१३ नुसार आदेश प्राप्त झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त आदेशानुसार प्रती पुस्तक ८५ रुपये १० पैसे दराप्रमाणे रुपये १३,६८,५७८/- किमतीच्या १६०८२ पुस्तिका छपाई करण्यास मे. मुकुंद आर्ट प्रिंटर यांना पत्र क्र. १९८६ दिनांक १ ऑक्टोबर, २०१३ नुसार आदेश देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जि.प. अकोलाचा सदर पुस्तक छपाईचा आदेश जि.प. मधील संशोधन सहाय्यक (कंत्राटी) यांनी दिनांक ३०/९/२०१३ रोजी MSSIDC कार्यालयात स्वतः घेऊन आल्याचे, तत्कालीन व्यवस्थापक MSSIDC यांनी दिनांक १५/१०/२०१५ ला चौकशी अधिकाऱ्याला दिलेल्या लेखी जबाबात स्पष्ट केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त छपाई आदेश कोणत्या दिनांकास प्राप्त झाला व साहित्य पुरवठा कधी झाला या बाबतच्या तफावती बद्दल शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशी मधील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (०२-०८-२०१७) :**(१) व (२) होय.

(३),(४) व ( ५) व्यवस्थापक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ (MSSIDC), अकोला यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांचे कडून सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वाचन-लेखन प्रशिक्षण हस्तपुस्तिका छपाईबाबत जि.प.पत्र क्र. ३१३/१३ दिनांक १९/०९/२०१३ नुसार आदेश दिनांक २०/०९/२०१३ रोजी प्राप्त झाला. तद्नंतर, जिल्हा परिषद अकोला यांच्या दिनांक १४/११/२०१३ च्या पत्रान्वये आदेशात नमुद साहित्य प्राप्त झाल्याचे शाखा व्यवस्थापक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांना कळविण्यात आले.

सदर प्रकरणी आदेशात नमुद सर्व साहित्य प्राप्त झाल्यानंतर संबंधित लघु उद्योग घटक (पुरवठाधारकास) त्यांचे देयक अदा करण्यात आले. या प्रकरणी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडे कोणतीही तक्रार जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### यवतमाळ जिल्ह्यासह राज्यात होत असलेली गुटखा विक्री

**(३५) ८०७१० (२०-०४-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभर सर्वत्र तंबाखू व तंबाखू मिश्रित वस्तूंच्या सेवनाला आळा घालण्याकरिता कायदा करण्यात आला असून उक्त कायद्याचे उल्लंघन होत असून यवतमाळ जिल्ह्यासह राज्यातील व्यावसायिक अवैधरित्या विक्री करत असल्याचे माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कायद्याची अंमलबजावणी करण्यास प्रशासन पुर्णतः अयशस्वी ठरले असून गुटख्याची अवैध विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर शासन कारवाई करीत नसल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने गुटख्याची अवैध विक्री करणाऱ्या व्यावसायिकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (०२-०८-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अन्न व औषध प्रशासनाच्या यवतमाळ येथील कार्यालयाने सन २०१६-१७ मध्ये एकुण ८२ ठिकाणी तपासण्या केल्या असून त्यापैकी ४६ ठिकाणी रु. ४५,५३,९५१/- किंमतीचा साठा जप्त केला आहे. तसेच अमरावती विभागामध्ये सन २०१६-१७ या कालावधीत एकुण ८१३ पेढयांची तपासणी करुन १८९ पेढयांवर कारवाई करुन रु.२,९१,४९,२८४/- किंमतीचा प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा जप्त केला आहे. तसेच सदर प्रकरणी मा. न्यायालयात एकुण २१० खटले दाखल केले आहेत.

तसेच प्रतिबंधित अन्नपदार्थांवर योग्य तो आळा बसण्यासाठी वेळोवेळी विशेष मोहिम आखून कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील निराधारांना मिळणा-या ६०० रूपयांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव

**(३६) ८०७३२ (२१-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निराधारांना मिळणा-या ६०० रूपयांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरूप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०७-२०१७) :** (१) होय,
(२) व (३) सदर प्रकरण आर्थिक बाबीशी निगडीत असल्याने या योजनांतील लाभार्थ्यांच्या मासिक अनुदानात वाढ करण्याच्या प्रस्तावावर विचारविनिमय सुरू आहे.

---

## राज्यात स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत १८ लाख शौचालये बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आल्याबाबत

**(३७) ८०८३७ (२०-०४-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १० हजार ७७० ग्रामपंचायती केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत हागणदारीमुक्त घोषित झाल्या असल्याचे माहे डिसेंबर २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यक्रमातंर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात राज्यात १८ लाख शौचालये बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाने कृती कार्यक्रम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०२-०८-२०१७) :** (१), (२) व (३) केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात राज्यातील ग्रामीण भागात १८,०४,२९९ वैयक्तिक शौचालये बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. तथापि, राज्य व जिल्हा स्तरावरुन केलेल्या विविध उपक्रमांमुळे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात निश्चित उद्दिष्टापेक्षा जास्त म्हणजे १९,१७,६७५ वैयक्तिक शौचालये बांधण्यात आली. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत राज्यात माहे डिसेंबर, २०१६ अखेर ११,४२१ ग्रामपंचायती हागणदारी मुक्त म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील १९ जिल्हयांमध्ये भूविकास बँकेच्या २८९ शाखा बंद केल्या असल्याबाबत

**(३८) ८०८४० (०६-०५-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १९ जिल्हयांमध्ये भूविकास बँकेच्या २८९ शाखा बंद करण्याचा निर्णय १२ मे,२०१५ रोजी घेवून २४ जुलै,२०१५ रोजी वा त्या सुमारास या बँकेच्या सर्व शाखा बंद केल्या असल्याचे माहे डिसेंबर,२०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने निधीची तरतूद करुन या बँकेतील १५०० कर्मचा-यांची २४९ कोटी रुपयांची देणी अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०८-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) दि.२४.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये "शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीतून येणारी रक्कम कर्मचाऱ्यांची देणी अदा करण्यासाठी पुरेशी नसल्यास बँकांच्या मालमत्तेच्या विक्रीमधून उपलब्ध होणाऱ्या रकमेतून कार्यरत/ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची देय रक्कम अदा करण्यात यावी" असा निर्णय घेतला आहे. तसेच शासनाच्या निर्देशानुसार शिखर भुविकास बँकेने राज्यातील जिल्हा भुविकास बँकांना वेळोवेळी रक्कम रूपये १४५.२८ कोटी कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी कर्जरूपाने उपलब्ध करून दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अलीबाग येथील पेन अर्बन बँकेतील ठेवीदारांना ठेवी मिळणेबाबत**

**(३९) ८०९९९ (२१-०४-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलीबाग येथील पेन अर्बन बँक गैरव्यवहारातील बोगस खातेदारांवर कारवाइ करून त्यांची मालमत्ता जप्त करावी व या मालमात्तेची विक्री करून ठेवीदारांना त्यांच्या ठेवी अदा कराव्यात अशी मागणी पेन अर्बन बँक ठेवीदार खातेदार संघर्ष समितीने जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्याकडे दिनांक १७ जानेवारी,२०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०८-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) बँकेतील बोगस कर्जखात्यांबाबत कारवाई करण्यासाठी पोलिस निरिक्षक, पेण पोलिस स्टेशन यांचे अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकाची नेमणुक करण्यात आली असून सदर पथकाने १२८ बोगस कर्जखात्यांमधून रु. २.२१ कोटी इतकी रक्कम जप्त केली आहे.

बँकेच्या रक्कमेमधून श्री. शैलेश देशपांडे व इतर यांच्या नावे खरेदी करण्यात आलेल्या ३९ मालमत्ता गृह विभागाच्या दिनांक २४.७.२०१३ रोजीच्या अधिसूचनेन्वये जप्त करण्यात आलेल्या आहेत. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र. ३१४४/२०१२ मध्ये न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी, अलिबाग यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

तसेच ठेवीदार संघर्ष समितीने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेली रिट याचिका क्र. ३६४४/२०११ मध्ये मा. न्यायालयाने सूचित केल्यानुसार बँकेच्या वसूलीचे संनियंत्रण व अनुषंगिक कामकाज करणेसाठी जिल्हाधिकारी, रायगड यांचे अध्यक्षतेखाली विशेष कृती समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीने बँकेच्या तत्कालीन संचालकांच्या १९४ मालमत्तांबाबत महाराष्ट्र ठेवीदार हित संरक्षण (एम.पी.आय.डी.) अधिनियम, १९९९ अंतर्गत कार्यवाही करण्याच्या सूचना सक्षम प्राधिकाऱ्यांना दिल्या असून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु आहे.

मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिका क्र. ३६४४/२०११ मध्ये न्यायालयाने दिनांक २०.८.२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार बँकेच्या १३६७९ ठेवीदारांना दिनांक ३१.३.२०१७ अखेर रु. ४.९५ कोटी इतक्या रक्कमेच्या ठेवींचे वाटप करण्यात आले आहे. तसेच उपरोक्त रिट याचिकेमध्ये मा. न्यायालयाने दिनांक २८.४.२०१७ रोजी दिलेल्या निर्देशानुसार बँकेकडे जमा असलेल्या रक्कमेपैकी रु. २६.९१ कोटी इतकी रक्कम रु.१०,०००/- ते रु. २५,०००/- पर्यंत ठेवी असलेल्या ठेवीदारांना शासकीय अभियोक्ता यांच्या मार्गदर्शनानुसार ठेवींचे वाटप करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली( पूर्व), मुंबई येथील हायवेवरील ब्रिज खालून रस्ता बनविण्याबाबत

**(४०) ८१०६५ (१२-०४-२०१७). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली( पूर्व), मुंबई येथील हायवेवरील ब्रिज खालून श्रीकृष्णनगर, बोरिवली (पूर्व) कडे जाणारा रस्ता बनविल्यास श्रीकृष्णनगर येथील नदी पूलावरील वाहतूकीची कोंडी सुटण्यास मदत होईल असा प्रस्ताव स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास एमएसआरडीसीचे सीईओ यांच्याकडे लेखी दिला असून अद्यापही या संदर्भात शासनाने निर्णय घेतला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय घेण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास,त्यांचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०८-२०१७) :**(१), (२) व (३) हे खरे नाही. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या प्रस्तावानुसार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत संजय गांधी राष्ट्रीय उदयान उड्डाणपुलाखाली नवीन रस्ता बनविण्यात आला असून, सदर रस्ता दि.१९.४.२०१५ पासून वाहतुकीस खुला करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील म्हसळा शहरासह संपुर्ण तालुक्यात मोठया प्रमाणात अवैध प्रवासी वाहतूक होत असल्याबाबत

**(४१) ८१२३५ (१३-०४-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील म्हसळा शहरासह संपुर्ण तालुक्यात मोठया प्रमाणात अवैध प्रवासी वाहतूक होत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियमाचें उल्लंघन करून अवैध प्रवासी वाहतूक करणा-यांवर शासन स्तरावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०२-०८-२०१७) :** (१) व (२) म्हसळा तालुक्यात अवैध प्रवासी वाहतुक होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. अशी वाहतूक करणाऱ्यांवर सन २०१६ मध्ये वाहतूक पोलिस द्वारा २८ वाहनांवर कारवाई करुन रु. २७,०००/- तडजोड शुल्क व रू.२०००/- दंड वसूल केला आहे. तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण यांनी जानेवारी, २०१७ ते जून, २०१७ या कालावधीत २०५ वाहनांना प्रतिवेदने दिले असून १४६ वाहनांकडून रू.७,३८,४२०/- दंड वसूल केला आहे, १४६ वाहनांची नोंदणी व चालकांची अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्र शासनाने केलेल्या कायद्यांचे मराठीत भाषांतर करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करण्याबाबत

**(४२) ८१४८० (२१-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने केलेल्या कायद्यांचे मराठीत भाषांतर करण्यासाठी लवकरात लवकर स्वतंत्र यंत्रणा उभी करण्याबाबतचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने राज्य सरकारला दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, कायद्याचे मराठीत अनुवाद करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा गठित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे;
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१७) :** (१) होय.
(२) भाषा संचालनालयामार्फत १७५ केंद्रीय अधिनियमांचा मराठीत अनुवाद करण्यात आलेला असून सदर केंद्रिय अधिनियम शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. उर्वरित केंद्रिय

अधिनियम संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याची कार्यवाही भाषा संचालनालयामार्फत सुरू आहे. याचबरोबर ६०२ राज्य अधिनियम मराठीतून प्रसिध्द करण्यात आले असून सदर अधिनियमदेखील शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी तालुक्यातील प्रलंबित वनहक्काची पूर्तता केल्याबाबत**

**(४३) ८२३३२ (१७-०४-२०१७). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य व केंद्र शासनाच्या आदेशाने आदिवासी, भूमिहिन, दलित व ओबीसी घटकांना वनपट्टे वाटप करण्याचे आदेश देण्यात येऊनही भिवंडी तालुक्यातील प्रलंबित वनहक्क दाव्यांची पूर्तता न करणाऱ्या वन व महसूल विभागाच्या कार्यालयावर माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान श्रमजीवी संघटनेने दिघाशी वनाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) तसेच भिवंडी तालुक्यातील मौजे सागांव, एकसाल, चिंचवली या गावातील कब्जा वहिवाटीतील दावेदारांचे दावे पूर्ण केलेले असतानाही वनपाल, दिघाशी यांनी मारलेल्या चुकीच्या शेऱ्यामुळे प्रलंबित आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (३१-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) भिवंडी तालुक्यातील मौजे सागांव, एकसाल, चिंचवली या गावातील कब्जा वहिवाटीतील दावेदारांनी दाखल केलेल्या प्रकरणांमध्ये त्रुटी आढळून आल्या होत्या. त्यामुळे सदरील प्रकरणे गटविकास अधिकारी यांचेमार्फत ग्रामसभा वनहक्क समितीकडे पाठविण्यात आली. प्रस्तुत प्रकरणे आता उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांचे कार्यालयास प्राप्त झालेली असून त्या कार्यालयाकडून प्रकरणांची पडताळणी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात खाद्य पदार्थ वर्तमानपत्रात बांधून विकण्यास मनाई करण्याबाबत**

**(४४) ८३५०५ (२०-०४-२०१७). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वडे, सामोसे, भजीपाव व भेळ इत्यादीसारखे खाद्यपदार्थ वर्तमानपत्रात बांधून ग्राहकांना पुरविण्यात येत असल्याने शाई चिकटलेले खाद्यपदार्थ खाणे मानवी आरोग्यास

अपायकारक असल्याने खाद्य पदार्थ वर्तमानपत्रात बांधून विकले जाणार नाहीत यावर निर्बंध घालण्यात यावे अशा सूचना माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केंद्र शासनाच्या फूड सेफ्टी अँड स्टँर्डड ॲथोरिटीने राज्य शासनास दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, सदर सूचनेच्या अनुषंगाने खाद्य पदार्थ वर्तमानपत्रात बांधून विकण्यास मनाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट (०२-०८-२०१७) :** (१) हे खरे आहे.
दि.०६/०१२/२०१६ च्या पत्रानुसार केंद्र शासनाने सूचना दिल्या आहेत.
(२) अन्न व औषध प्रशासनाने राज्यात विविध ठिकाणी कार्यशाळा घेऊन खादय पदार्थ वर्तमानपत्रात विकू नये याकरीता अन्न व्यवसायिकांमध्ये जागृती करण्याचे कार्य केले आहे. या अंतर्गत प्रशासनाच्या विविध कार्यालयाद्वारे एकुण १२७ कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली जिल्ह्यामध्ये औद्योगिक वसाहतीत २७३ भुखंड बनवले असून केवळ ९३ उद्योग सुरु असल्याबाबत**

**(४५) ८३८२६ (२१-०४-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यामध्ये औद्योगिक वसाहतीत २७३ भुखंड बनवले असून केवळ ९३ उद्योगच सुरु आहेत तसेच १८० भुखंडावर उद्योग उभारणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,या ठिकाणी नव्याने उद्योग सुरु करु इच्छिणा-या उद्योजकांना भुखंड नसल्याने भावी उद्योजकांना अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १८० भूखंडावर उद्योग सूरू नसल्याने सदर भुखंड परत घेण्यात यावे अशी मागणी भावी उद्योजकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त बाब १,२ व ३ नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२७-०७-२०१७) :** (१) हिंगोली औद्योगिक क्षेत्रातील २७५ भूखंडापैकी १२२ भूखंडावर उत्पादन सुरु आहेत. १५३ भूखंडापैकी वाटपास उपलब्ध व परत घेतलेले असे ११ भूखंड आहेत. तसेच १२३ भूखंडाचा विकास कालावधी शिल्लक आहे.

(२) हे खरे नाही. वाटपास उपलब्ध असलेले भूखंड महामंडळाच्या धोरणानुसार वाटप करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हिंगोली औद्योगिक क्षेत्रामध्ये २७५ भुखंडाचे आरेखन करण्यात आले आहे. त्यापैकी २६७ भुखंडाचे वाटप झाले आहे. १२५ भुखंडधारकांनी इमारत पुर्णत्वाचा दाखला घेतलेला आहे. त्यापैकी १२२ इतक्या भूखंडावर उत्पादन सुरु आहे. विकास कालावधी शिल्लक असलेले ११० भुखंड आहेत. विकास कालावधी पूर्ण होवून सुध्दा भूखंड विकासाबाबत परिणामकारक (effective Steps) न घेतलेले भुखंड परत घेण्याची कार्यवाही महामंडळाच्या स्तरावर सुरु असून करारनाम्यातील तरतूदीनुसार भूखंड परत महामंडळाच्या ताब्यात घेऊन भूखंडाचा परतावा आदेश दिनाकांपासून ३ महिने पुर्ण होताच सदर भूखंड महामंडळाच्या दि. ३/६/२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार ज्या औद्योगिक क्षेत्रात सर्व भूखंडाचे वाटप पूर्ण झालेले असेल अशा औद्यागिक क्षेत्रात उद्योग विस्तार / प्राधान्य सदराखाली भूखंड वाटपासाठी निश्चित केलेल्या धोरणानुसार विना निविदा सरळ पध्दतीने वाटप करण्यात येतात तसेच ज्या औद्योगिक क्षेत्रात अशी मागणी नसल्यास सदरचे भूखंड निविदाव्दारे वाटप करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उंबरखेड (ता.तिवसा जि.अमरावती) येथील काही शेतक-यांची नावे सावकारी कर्ज माफी यादीतून वगळण्यात आल्यामुळे त्यांना कर्ज माफीस अपात्र ठरविल्याबाबत**

**(४६)** *८३८५७* **(२१-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबरखेड (ता.तिवसा जि.अमरावती) येथील काही शेतक-यांची नावे सावकारी कर्ज माफी यादीतून वगळण्यात आल्यामुळे त्यांना कर्ज माफीस अपात्र ठरविल्याने ते या योजनेपासून वंचित राहिले असल्याने त्यांची नावे सावकारी कर्ज माफी यादीत पुन्हा घेण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था अमरावती यांना दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदरहू निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०८-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) अमरावतीमधील परवानाधारक सावकार श्री. महादेवराव कुबडे यांनी त्यांचेकडील कर्जदारांची यादी विहीत मुदतीत सादर केली नसल्याने पात्र कर्जदार सावकारी कर्जमाफी योजनेपासून वंचित राहिले. सबब सदर सावकाराविरुद्ध उप निबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी दिनांक १२.१.२०१७ रोजी पोलिस स्टेशन, सिटी कोतवाली, अमरावती येथे गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदर सावकाराचा परवाना रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचे कार्यालयात दाखल केला असून प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.

परवानाधारक सावकार श्री. कुबडे यांनी त्यांच्याविरुद्ध दाखल केलेला गुन्हा रद्द करण्यासाठी मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे क्रिमीनल रिट याचिका क्र. ४८/२०१७ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(३) प्रश्न उद्‌भवतनाही.

---

**नांदगाव पेठ (जि.अमरावती) येथील औद्योगिक क्षेत्र व औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी रेल्वे लाईनच्या भुसंपादनाच्या जमिनीचा मोबदला रक्कम त्वरीत मिळण्याबाबत**

**(४७)** *८३८६०* **(०६-०५-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव पेठ (जि.अमरावती) येथील औद्योगिक क्षेत्र व औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी रेल्वे लाईनच्या भुसंपादीत क्षेत्र ०.२० हे.आर. या जमिनीचा मोबदला रक्कम १.९८ कोटी त्वरीत मिळण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. सार्वजनिक बांधकाम,उद्योग व पर्यावरण राज्यमंत्री यांना दिनांक ३० एप्रिल,२०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदरहू निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (२८-०७-२०१७) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्र व औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी टाकण्यात आलेल्या रेल्वे लाईनच्या भूसंपादनातील तुकडा पडलेल्या ५.११.०० हे. आर जमिनीची नुकसान भरपाईची रक्कम भरणा करणेबाबत मे.इंडिया बुल्स कंपनीला महामंडळाने कळविले होते.तथापि कंपनीने ०.२० हे.आर वरील जमिन घेणे शक्य होणार नसल्याचे कळविले असून ०.२० हे.आर पेक्षा कमी असलेली जमिन स्वतंत्र चौकशी करुन खरेदी करण्यास कंपनीने तयारी दर्शविलेली आहे.तदनंतर दिनांक २४/११/२०१५ रोजीच्या पत्रानुसार कंपनीने जमिनीचे नव्याने सर्वेक्षण करुन अंतिम निर्णय घेणेबाबत विनंती केली असता महामंडळाने रकमेचा भरणा करण्याबाबत कळविले होते.मात्र कंपनीने ०.२० हे.आर वरील क्षेत्र संपादन करण्यास तयारी नसल्याचे कळविले असून ०.२० हे.आर पेक्षा कमी असलेल्या तुकडा जमिनीची स्वतंत्र चौकशी करुन क्षेत्र संपादन करण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.मे.इंडिया बुल्स कंपनीने मोबदला रकमेचा भरणा केल्यास जमिन खरेदीबाबतची पुढील कार्यवाही करणे महामंडळास शक्य होईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्र शासन व दि सुप्रिम इंडस्ट्रीज लिमी. गाडेगाव, मेगा प्रोजेक्टबाबत**

**(४८) ८३९३४ (२१-०४-२०१७). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासन व दि सुप्रीम इंडस्ट्रीज लिमी. गाडेगाव (ता.जामनेर, जि.जळगाव) यांच्यात मेगा प्रोजेक्ट संदर्भात करार करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कंपनीने जळगाव येथील डी-१०१,१०२ ह्या त्याच्या कंपनीतून जुन्या मशिनरी मेगा प्रोजेक्ट असलेल्या ठिकाणी आणून लावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,ह्या मशिनरीची किंमत नवीन गुंतवणुकीत दाखवण्यात आलेल्या आहे किंवा नाही,

(४) तसेच या कराराअंतर्गत लागू नसतांनाही कंपनीने शासनाची किती रुपयांची फसवणूक केली आहे,

(५) शासनाची फसवणूक केलेल्या संबधित कंपनीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई (२७-०७-२०१७) :**(१) महाराष्ट्र शासन व दि सुप्रीम इडंस्ट्रीज लिमी. यांच्या दरम्यान दि.७.११.२००६ रोजी करार करण्यात आलेला आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

घटकाने सादर केलेल्या सनदी लेखापालाच्या प्रमाणपत्र व मे.सिकॉम लि.यांनी सादर केलेल्या मुल्यांकनानुसार घटकास पात्रता प्रमाणपत्र देय करण्यात येऊन पात्र गुंतवणुकीवर प्रोत्साहने अनुज्ञेय केली आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्भवतनाही.

---

**यवतमाळ जिल्हयातील बहुतांश विद्यार्थी जिल्हा परिषदेअंतर्गत शासनातर्फे मिळणाऱ्या वसतीगृह अनुदान (निधी) अभावी शिक्षणापासून वंचित असल्याबाबत**

**(४९) ८४०७३ (२१-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील बहुतांश विद्यार्थी जिल्हा परिषद अंतर्गत शासनातर्फे मिळणाऱ्या वसतीगृह अनुदान (निधी) अभावी शिक्षणापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,किती वसतीगृहाचे अनुदान अद्यापही प्रलंबित आहे,

(३) असल्यास,प्रलंबित अनुदानामुळे विद्यार्थ्यांना होणाऱ्या गैरसोईबद्दल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले (२९-०७-२०१७) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) आरक्षणानुसार प्रवेश नसणे व बायोमेट्रिक यंत्रणा न बसवणे या कारणामुळे ३३ वसतिगृहांचे परिपोषण अनुदान अद्यापही प्रलंबित आहे.

(३) होय, चौकशी करण्यात आली आहे. सदर अनुदानित वसतिगृहांना आरक्षणानुसार प्रवेशाबाबत शिथिलता मिळवून देणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. यवतमाळ यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे. तसेच सदर ३३ अनुदानित वसतिगृहांमध्ये बायोमेट्रिक संयंत्र सुरु करून विद्यार्थ्यांचे उपस्थितीपत्रक परिपोषण अनुदान नस्तीसोबत जोडले नसल्यामुळे परिपोषण अनुदान वितरित करता आले नसल्याने याबाबत संबंधितांची कार्यशाळा घेऊन मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. सदर ३३ अनुदानित वसतिगृहांनी सदर बाबींची पूर्तता केल्यानंतर त्यांना परिपोषण अनुदान वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेड (जि.पुणे) विशेष आर्थिक क्षेत्र (पुणे) टप्पा क्र.२ मधील संपादित क्षेत्र वगळण्याबाबतची विना अधीसुचना काढणेबाबत**

**(५०) ८४५०६ (२१-०४-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील खेड विशेष आर्थिक क्षेत्र टप्पा क्र.२ करिता दिनांक १७/०७/२००६ अन्वये २९५८.३४ हे.आर तसेच १७/०४/२०१० अन्वये २०४.८१ हे.आर असे एकूण ३१६३.१५ हे.आर क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम प्रकरण ६ नुसार शासनाने अधिसूचना प्रसिद्ध करून खेड विशेष आर्थिक क्षेत्र टप्पा क्र.२ मध्ये ७ गावांचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकरण ६ अन्वये अधिसूचित ३१६३.१५ हे.आर क्षेत्रापैकी अधिनियमाच्या कलम ३२ (२) च्या हरकतीनुसार एकूण ७ गावातील २५९३.६२५० हे.आर क्षेत्र वगळण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने शासनास दि.०६/०५/२०१५ च्या प्रपत्रान्वये सदर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली आहे काय,

(४) असल्यास, मंजुरी दिल्यानंतर याबाबतची अधिसूचना न काढण्याची कारणे काय, आहेत व त्याची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (२७-०७-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

खेड तालुक्यातील मौजे पूर, चौधरवाडी, गोसासी, वाफगाव, पाबळ, रेटवडी व वरुडे या ७ गावांचा समावेश करण्यात आला होता.

(२) होय, हे खरे आहे.

भूधारकांच्या तीव्र विरोधामुळे ७ गावातील संपूर्ण क्षेत्र वगळण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

(३) होय.

(४) प्रस्तावाबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या प्रकरण ६ नुसार ३२ (१) बाबत तपासणी करण्यात येत असून ७/१२ उताऱ्यावरील क्षेत्र, आकारबंद नोंदवही यानुसार क्षेत्रमेळ घेण्यात येत आहे. क्षेत्रमेळाचे अवलोकन करुन प्रस्ताव फेरसादर करुन क्षेत्र विनाअधिसूचित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.